ePaper

## इथेनॉल धोरणाने देशातील साखर उद्योगाचा कायापालट—अजित पवार



| वर्ष - 8 | अंक - 289 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 24 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- नंबर १ बनण्याची संधी गमावली!
- चेतेश्वर पुजारा इंग्लंड दौऱ्यावर जाणार
- मोहम्मद युनूस राजीनामा देणार?
- हार्वर्ड विद्यापीठाचा ट्रम्पला दणका



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं रणशिंग फुंकलं

# लागा तयारीला...!

### येत्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात राज्यात जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुका

| सांगली | प्रतिनिधी | महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला राज्यात मोठं यश मिळालं होतं. महायुतीच्या अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने जोरदार पुनरागमन केलं, राज्यात तब्बल 232 जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले तर महाविकास आघाडीला मात्र अवघ्या 50 जागांवरच समाधान मानावं लागलं. पुन्हा एकदा राज्यात महायुतीचं सरकार सत्तेत आलं. दरम्यान आता सर्वांचं लक्ष लागलं आहे ते म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे... मधल्या काळात अनेक महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडल्या आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काय होणार? कोण बाजी मारणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. येत्या सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यामध्ये महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगलीमधून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले आहे.**




देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले आहे. येत्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात राज्यात जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुका लागतील, दीड महिन्यात या सगळ्याच निवडणुका उरकल्या जातील. जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक एकत्र होईल, त्यामुळे स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीने ताकतीने काम करा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केलं आहे, ते सांगलीमध्ये आयोजित भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांचं सरकार जेव्हा महाराष्ट्रात आलं होतं. तेव्हा महाराष्ट्रातील संगळीच कामं थांबली होती, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. तसेचं महाराष्ट्राच्या विकासासाठी यापुढे संस्थात्मक बदल करणं गरजेचं आहे, असं देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना म्हटलं आहे. दरम्यान दुसरीकडे सांगली पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या नूतन इमारतीचं लोकार्पण व विविध विकासकामांचं उद्घाटन देखील आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडलं. कडेगाव आणि आटपाडी पोलीस ठाण्याच्या नूतन इमारतीचं देखील उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज संपन्न झालं. यावेळी सांगली पोलीस दलाला मिळालेल्या नवीन 19 वाहनांचं देखील लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. या कार्यक्रमाला सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार विशाल पाटील, आमदार सुरेश खाडे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार विश्वजित कदम यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले आहे. येत्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात राज्यात जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुका लागतील, दीड महिन्यात या सगळ्याच निवडणुका उरकल्या जातील. जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक एकत्र होईल, त्यामुळे स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीने ताकतीने काम करा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केलं आहे, ते सांगलीमध्ये आयोजित भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांचं सरकार जेव्हा महाराष्ट्रात आलं होतं. तेव्हा महाराष्ट्रातील संगळीच कामं थांबली होती, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# आयटी कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' मागण्याची वेळ

## रस्त्यांचे रुंदीकरण आणि पर्यायी मार्ग तयार करण्याकडे दुर्लक्ष

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नियोजित प्रकल्प कागदावरच राहिल्याने मान्सूनपूर्व पावसातच आयटी पार्कमधील वाहतूक समस्या बिकट बनली आहे. दररोज संध्याकाळी काही किलोमीटरच्या वाहनांच्या रांगा लागत असल्याचे चित्र आहे.**



### अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही

, अशी मागणी होऊ लागली आहे.गेल्या काही वर्षात आयटी पार्कमधील कंपन्यांची आणि पर्यायाने वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. याच वेळी रस्त्यांचे रुंदीकरण आणि पर्यायी मार्ग तयार करण्याकडे दुर्लक्ष झाले. वाहतूक कोंडीच्या समस्येवर वारंवार आरडाओरडा होऊ लागल्याने अखेर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून नियोजनापलीकडे या प्रकल्पांवर काम झालेले नाही. 'एमआयडीसी'च्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पांसाठीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करून मुख्यालयाला पाठविला आहे. त्यावरही अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

तंत्रज्ञान कर्मचाऱ्यांसाठी 'वर्क फ्रॉम होम' म्हणजेच घरून काम करण्याची सक्ती सरकारने करावी, अशी मागणी होऊ लागली आहे. गेल्या काही वर्षात आयटी पार्कमधील कंपन्यांची आणि पर्यायाने वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. याच वेळी रस्त्यांचे रुंदीकरण आणि पर्यायी मार्ग तयार करण्याकडे दुर्लक्ष झाले. वाहतूक कोंडीच्या समस्येवर वारंवार आरडाओरडा होऊ लागल्याने अखेर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून नियोजनापलीकडे या प्रकल्पांवर काम झालेले नाही. 'एमआयडीसी'च्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पांसाठीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करून मुख्यालयाला पाठविला आहे. त्यावरही अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. वर्षानुवर्षे आपण तेच मुद्दे मांडत आहोत. परंतु, कोणालाही त्याचे काहीच पडलेले नाही. आधीच आयटी क्षेत्रात प्रचंड बदल होत आहेत, नोकऱ्या धोक्यात आहेत, नवीन नोकऱ्या मिळणे अवघड बनले आहे.

त्यात वाहतूक कोंडीमुळे कर्मचाऱ्यांचा शारीरिक आणि मानसिक त्रास वाढत आहे. त्यामुळे पावसाळ्यात कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा द्यावी.-आयटी पार्कमध्ये पुरेशा पायाभूत सुविधा देण्यात सरकार अपयशी ठरले आहे. पावसाळ्यात वाहतूक नियमनासह सांडपाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे सरकारनेच कंपन्यांवर आता 'वर्क फ्रॉम होम'ची सक्ती करावी. कर्मचारी कार्यालयातून घरी परतताना दररोज दोन ते तीन तास वाहतूक कोंडीत अडकत आहेत. यातून केवळ कर्मचाऱ्यांच्या उत्पादकतेवरच नव्हे, तर त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. हिंजवडीतील आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ता रुंदीकरणासह पर्यायी मार्गांचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. या प्रकल्पांचे भूसंपादन 'एमआयडीसी'कडून केले जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव 'एमआयडीसी'च्या मुख्यालयाला पाठविण्यात आला आहे. त्यामुळे आता या पावसाळ्यात माहिती तंत्रज्ञान कर्मचाऱ्यांसाठी 'वर्क फ्रॉम होम' म्हणजेच घरून काम करण्याची सक्ती सरकारने करावी.

# अजित पवार यांनी वैष्णवीच्या कुटुंबियांची घेतली भेट

## अजित पवार यांनी कस्पटे कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी कस्पटे – हगवणे मृत्यू प्रकरणात आता सर्व आरोपींना गजाआड केलेले असून त्यांची चौकशी सुरू आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज कस्पटे कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि परिस्थिती जाणून घेतली. कस्पटे कुटुंबियांशी अर्धा तास चर्चा केल्यानंतर अजित पवारांनी बाहेर येऊन माध्यमांशीही संवाद साधला. वैष्णवीच्या प्रकरणाची जलदगती न्यायालयात सुनावणी केली जावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे ते म्हणाले.**



### शिक्षा होण्यासाठी लक्ष घालणार

च कुणाचीही हयगय न करता या प्रकरणातील आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा होण्यासाठी लक्ष घालणार असल्याचेही ते म्हणाले.अजित पवार यावेळी म्हणाले, "वैष्णवीच्या मृत्यूची घटना घडल्यानंतर कुणाचीही हयगय न करता, कुणाचाही राजकीय हस्तक्षेप आला तरी न जुमानता कारवाई करण्यास सांगितले होते.

तसेच कुणाचीही हयगय न करता या प्रकरणातील आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा होण्यासाठी लक्ष घालणार असल्याचेही ते म्हणाले.अजित पवार यावेळी म्हणाले,"वैष्णवीच्या मृत्यूची घटना घडल्यानंतर मी पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्तांशी चर्चा करून जे घडले ते योग्य नाही, असे म्हटले होते. कुणाचीही हयगय न करता, कुणाचाही राजकीय हस्तक्षेप आला तरी न जुमानता कारवाई करण्यास सांगितले होते.

वैष्णवीला ज्यापद्धतीने छळले, त्यासंबंधित जे कुणी आरोपी असतील त्यांना पकडले गेले पाहिजे, असे निर्देश दिले होते. पोलिसांनी वैष्णवीची सासू, नणंद आणि पतीला अटक केली. तसेच सासरे राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे फरार होते. पण त्यांनाही अटक करण्यात आली आहे.मी कालच वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांच्याशी फोनवर संवाद साधला होता. मी तुमची भेट घेणार असल्याचे सांगितले होते. तुम्ही मला मनमोकळेपणाने काहीही असेल तर सांगावे, असे त्यांना बोललो होतो. या प्रकरणात आणखी एक चव्हाण नावाची व्यक्ती पुढे आली आहे.

वैष्णवीचे बाळ ज्या पद्धतीने हाताळले ते रेकॉर्डवर आलेले आहे. त्या व्यक्तीविरोधातही तक्रार दाखल झाली असून त्याचाही शोध सुरू आहे.

आज जर तो सापडला नाही तर पोलीस आयुक्त पुढील कारवाई करतील", असेही अजित पवार म्हणाले.अजित पवार पुढे म्हणाले की, कस्पटे कुटुंबियांना न्याय मिळायला हवा, असा आमचा प्रयत्न राहणार आहे. न्यायालयातही खटला ताकदीने चालावा यासाठी चांगला सरकारी वकील देण्याची आमची तयारी आहे.

कस्पटे कुटुंबियांकडूनही काही नावे सुचविण्यास सांगितले आहे. सरकारी वकिलावर कुणाचाही दबाव येता कामा नये. याची खबरदारी घेतली जाईल.हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे सांगताना अजित पवार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी उद्या दिल्लीला जाणार आहोत. त्यावेळी दोन तास आम्ही विमानात एकत्र असू. सदर प्रकरण जलदगती न्यायालयात चालवले जावे, अशी मागणी त्यांच्याकडे करणार आहे.

## आलिशान कारमधून फिरत

# फार्म हाऊस, लॉज, शेतावर राजेंद्र हगवणेचा मुक्काम

## सात दिवसानंतर पोलिसांनी स्वारगेट येथून केले गजाआड

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुनेचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या नराधम सासऱ्याला आपल्या या कृत्याबद्दल जराही पश्चाताप नसल्याचे त्याच्या सात दिवसातील प्रवासाने समोर आले आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचा माजी तालुकाध्यक्ष आणि राज्य कार्यकारिणी सदस्य असणारा सासरा राजेंद्र हगवणे याला सत्तेचा माज असल्याचेच यातून दिसून आले आहे. पोलीस चौकशीत बलेनो, थार, इंडेव्हर अशा आलीशान कारमधून तो फिरल्याचे, फार्म हाऊस, लॉज, शेतावर राहत यथेच्छ पार्ट्यांही झोडल्याचे आणि मटणावर ताव मारल्याचेही समोर आले आहे.**




पोलीसांनी आरोपी सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे या पिता-पुत्राला स्वारगेट येथे जेरबंद केले. पोलीस चौकशीत तो सात दिवस आपल्या शेजारच्या तालुक्यातच राजरोसपणे फिरत असल्याचे निष्पन्न झाले आहे. राजेंद्र हगवणे गेल्या सात दिवसांत कुठे कुठे फिरला, याबाबत माहिती समोर आली आहे. त्याच्या सात दिवसातील प्रवासात त्याने वेळोवेळी आपल्या गाड्या बदलल्या. वैष्णवीच्या मृत्यूनंतर १७ मे रोजी तिचा मृतदेह औंध रुग्णालयात पाहण्यासाठी हे दोघे पिता-पुत्र इंडीव्हर कारने गेले होते. त्यावेळी अटकेची शक्यता लक्षात येताच त्यांनी तात्काळ गाडी बदलून थार गाडीने पळ काढला.

त्यानंतर त्यांनी मुहूर्त लॉन्स, पवना धरणा जवळील एका फार्म हाऊसवर मुक्काम केला. त्यानंतर आळंदी येथे जात लॉजवर मुक्काम केला. १८ मे रोजी बलेनो कारने त्यांनी पवना धरणा जवळील एका मित्राकडे मुक्काम केला. १९ मे रोजी सातारा जिल्ह्यातील पुसेगाव येथे एकाच्या शेतावर त्यांनी मुक्काम ठोकला. १९ आणि २० मे रोजी पसरणी मार्गे कोगनळी येथे जात त्यांनी एका आलीशान हॉटेलात मुक्काम केला. त्यानंतर २१ मे रोजी कोगनळी येथील एका मित्राच्या शेतावर ते राहिले.

गेल्या दोन दिवसांपासून हे प्रकरण पेटल्यानंतर गुरूवारी (दि. २२) राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनीही राजेंद्र हगवणे याला सोडणार नाही. त्याला मुसक्या आवळून आणू, असा इशारा देत पोलीसांनाही तपासासाठी पथके वाढविण्याच्या सुचना केल्या होत्या. त्यामुळे घाबरलेले हे नराधम पिता-पुत्र २२ मे रोजी पुन्हा पुण्यात परतले आणि स्वारगेट येथे पोलीसांनी त्यांना जेरबंद केले.

---

# वैष्णवीच्या छळाबाबत तक्रार आली नाही!

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे स्पष्टीकरण

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर गंभीर आरोप होत आहेत. यावर चाकणकर यांनी आपली भूमिका सपष्ट करीत माध्यमांसमोर बाजू मांडली. "वैष्णवीच्या छळासंबंधी महिला आयोगाकडे कोणतीही तक्रार आली नव्हती. मी स्वतः गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपींना अटक केली असून, अजून काही गुन्हे दाखल करायचे आहेत का, यावर अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली आहे."**




चाकणकर यांनी शुक्रवारी (दि. २२) कस्पटे कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या की, मयुरी आणि करिष्मा हगवणे यांच्या तक्रारी महिला आयोगाला मिळाल्या होत्या. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी करिष्मा हगवणे यांनी भाऊ व भावजयविरोधात तक्रार दिली होती, तर त्याच दिवशी मयुरी हगवणे यांचा भाऊ मेघराज जगताप यानेही आयोगाकडे तक्रार केली. या दोन्ही तक्रारी संबंधित पोलीस ठाण्याला पाठवून कारवाईचे निर्देश दिले होते. या प्रकरणात क्रॉस कंप्लेंट असल्याने पोलिसांनी समुपदेशनाद्वारे वाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता. चाकणकर म्हणाल्या की, वैष्णवीच्या मृत्यूपूर्वी तिच्याविरोधात कोणतीही तक्रार आयोगाकडे आली नव्हती. पोलिसांनी या प्रकरणाचा उत्तम तपास केला असून, तिच्या बालकाला आई-वडिलांकडे सुखरूप सोपवण्यात आलं आहे. दरम्यान, चाकणकर यांनी मयुरी हगवणे प्रकरणात अजूनही चार्जशीट दाखल न झाल्याबद्दल चिंता व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत याबाबत चर्चा करणार असल्याचंही सांगितलं. "नोव्हेंबर २०२४ मध्ये पौड पोलीस स्टेशनचा कार्यक्षेत्र पुणे ग्रामीणमध्ये होता, सध्या तो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात आहे. वैष्णवीला न्याय मिळवून देण्यासाठी आऊट ऑफ वे जाऊन काम करणं ही माझी जबाबदारी आहे, असंही

### खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालेल - अजित पवार

पिंपरी चिंचवड शहरांमध्ये वैष्णवी हगवणे बाबत घडलेला प्रकार अतिशय निंदनीय आहे. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालेल, याचा लवकर निकाल लागेल असा शब्द वैष्णवी हिच्या आई वडिलांना दिला असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी हुंडाबळी ठरलेल्या वैष्णवी हगवणे हिच्या माहेरी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. वैष्णवीच्या आई-वडिलांची भेट घेत संपूर्ण घटना जाणून घेतली. यावेळी, मोठा पोलीस बंदोबस्त कस्पटे कुटुंबीयांच्या घराबाहेर दिसून आला. पीडित कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधत भूमिका व तपासाबाबत माहिती दिली. तसेच, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालेल, याचा लवकर निकाल लागेल असेही अजित पवारांनी सांगितले. तर, वैष्णवीचे मामासासरे असलेल्या पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनाही अजित पवारांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणात फरार आरोपी राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा शशांक हगवणे यांस पोलिसांनी आज पहाटेच्या सुमारास अटक केली. या अटकेनंतर त्यांना न्यायालयात हजर केले असता, 28 मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# जातगणनेतून समाजाच्या एकात्मतेकडे



भूमिका

**'विदा' अर्थात 'डेटा'चे आजच्या काळातले महत्त्व कोणीही नाकारू शकत नाही. डिजिटल युगातले व्यवसाय तर नेमक्या विदेविना तगू शकत नाहीतच, पण सामाजिक न्यायासाठीही विदा अपरिहार्य ठरते आहे. त्यामुळेच 'जातवार जनगणने'सारख्या मागणीचे गांभीर्यही वाढते. विशेषत: भारतीय समाज अनेकविध विषमतांनी ग्रासलेला आहे.**

आणि त्यातल्या काही विषमतांची स्पष्टपणे चर्चाही होत नाही, असे असताना नेमके सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठी जातवार जनगणनेतून मिळणारी विदा महत्त्वाची ठरणार आहे. त्यातून कदाचित, काही कटु सत्यांचाही सामना आपल्याला एक समाज म्हणून करावा लागणार आहे. जातवार जनगणना हा सामाजिक न्यायाचा एक आधार ठरेल आणि त्यायोगे राष्ट्रउभारणी करता येईल, असा विचार प्रथम राहुल गांधी यांनी मांडला. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी त्या राज्यात तो प्रत्यक्षात आणताना, काटेकोरपणाकडे लक्ष पुरवले. त्यामुळेच तेलंगणात जे जातवार सर्वेक्षण झाले ते विधानसभेच्या पटलावर ठेवून, त्याच्या निष्कर्षांआधारे मागास वर्गासाठी (बॅकवर्ड क्लासेस) सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणसंस्थांमध्ये तसेच लोकप्रतिनिधित्वातही ४२ टक्के राखीव जागांची तरतूद मांडता आणि मंजूर करता आली. या तरतुदीला राष्ट्रीय स्वरूप मिळावे, त्यासाठी



जातवार जनगणना व्हावी ही मागणी रेवंत रेड्डी यांनी दिल्लीत २ एप्रिल रोजी, जंतर मंतर येथे तेलंगणातील काँग्रेसजनांच्या साथीने धरणे धरून मांडली होती .या साऱ्याचा परिणाम केंद्र सरकारवरही झालाच (पंतप्रधानांनी जातवार जनगणना होणार असल्याचे जाहीर केले, ते ३० एप्रिल रोजी). राज्यसभेत मी तेलंगणाचे प्रतिनिधित्व करतो आणि या राज्याने राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्र उभारणीची नवी दिशा देशाला दाखवण्यात सक्रिय पुढाकार घेतला, याचा सार्थ अभिमान मला आहेच. पण तेलंगणाने नेमके काय केले, याची पुरेशी माहिती नसलेल्यांनी ती करून घ्यायला हवी, इतके ते महत्त्वाचे आहे. एकतर, तेलंगणातील जात-सर्वेक्षणामध्ये व्याप्ती आणि काटेकोरपणा हे दोन्ही होते.

ही व्याप्ती निव्वळ संख्येपुरती नव्हती. सामाजिक, आर्थिक, राजकीय, आर्थिक आणि नोकरी/व्यवसायविषयक से सारे पैलू या जातवार सर्वेक्षणात होते. त्यामुळे समाजाचा 'एक्स-रे' निघाला आणि सामाजिक न्यायाची प्रतीक्षा अद्यापही कोणत्या समाजघटकांना आहे, हे ठरवण्यातही अधिक नेमकेपणा आला.यापूर्वी ब्रिटिशांच्या काळात, १९३१ मध्ये जातवार जनगणना म्हणून जे काही झाले होते, त्यात 'कुणाची जात कोणती'- आणि फारतर, ते कोणत्या प्रांतात राहातात, एवढेच उमगत होते- कारण जातिआधारित विषमतेचा थांग लावू पाहाणारे प्रश्न ९५ वर्षांपूर्वीच्या त्या गणनेत नव्हत (तेव्हा विषमता होतीच, पण या गणनेचा आधार घेऊन सामाजिक न्याय पुढे नेण्याची तत्कालीन राज्यकर्त्यांची इच्छा नव्हती म्हणून असे -झाले असावे). आता येत्या काळात- अद्याप तारीख अथवा वेळापत्रक वगैरे काहीच जाहीर झालेले नसले तरी- जेव्हा केव्हा जातवार जनगणना होईल, तेव्हा केंद्र सरकारने ब्रिटिशांचा कित्ता न गिरवता तेलंगणाचा आदर्श ठेवावा. अशी अपेक्षा आहे.सामाजिक विषमतेच्या अनेकतोंडी राक्षसाशी आपल्याला लढायचे असेल, तर जातवार जनगणना करणे ही एक नैतिक, संवैधानिक आणि राजकीय अत्यावश्यकता आहे. केवळ ग्रामीण भागातच नव्हे, महानगरांतल्या टोलेजंग इमारतींमध्येही जातीय पूर्वग्रह व्यापक प्रमाणात आजही दिसून येतात, हे आपले वास्तव आहे. अचूक आणि तपशीलवार माहितीशिवाय, सर्वांत वंचित समाजघटक कोणते हे आधी नेमके ओळखणे आणि मग त्यांची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी हस्तक्षेप करणे जवळपास अशक्यच ठरते. जातीय जनगणना हा काही कुणावर उपकार नव्हे, ती दानधर्माची कृती नाही; ती न्यायासाठी एक शस्त्र आहे. आजवरच्या अस्पष्ट आश्वासनांऐवजी विदा-आधारित धोरणांतून मिळणाऱ्या हमीसाठी जातवार जनगणनेला पर्यायच नाही.कोणत्याही कल्याणकारी राज्याचे ध्येय सार्वजनिक संसाधनांचे न्याय्य वाटप हेच असते, ते जातवार जनगणनेमुळे अधिक सुकर होईल.यामुळे अधिक अचूकपणे आखलेले- नेमक्या समाजघटकांसाठी आणि नेमक्या प्रमाणात आखलेले कल्याणकारी कार्यक्रम प्रत्यक्षात येतील.

## प्रासंगिक »

### शस्त्रक्रिया यशस्वी

***उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उभी राहिलेली कोणतीही हिंसक चळवळ दीर्घकाळ तग धरू शकत नाही. असे प्रश्न सोडवण्यासाठी लोकशाहीचाच मार्ग यशाकडे जातो.***

जहाल डाव्या विचारांचे लोक गेल्या शतकात क्रांतीच्या मार्गानेच सत्ता मिळवता येते या तत्त्वावर ठाम राहिले. हेच तत्त्व कवटाळून सरकारविरुद्ध युद्धाची भाषा करणाऱ्या नक्षल चळवळीला आता अखेरची घरघर लागलेली दिसते ती यामुळे. छत्तीसगडमध्ये बुधवारी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत या चळवळीचा सर्वोच्च नेता नंबाला केशवराव ऊर्फ बसवराजू मारला गेला. या यशाबद्दल अतिशय प्रतिकूल परिस्थितीत नक्षलींशी लढणाऱ्या सुरक्षा जवानांचे अभिनंदन. ही चकमक झाली ते ठिकाण अबूजमाड नक्षलींचा गड अशी ओळख असलेल्या पहाडाच्या पायथ्याशी असून ते 'ट्राय जंक्शन' म्हणून ओळखले जाते. या कारवाईमुळे ही चळवळ गेल्या ५० वर्षांत पहिल्यांदाच नेतृत्वहीन झाली.

'भुजबळ यांना मंत्रीपदाची शपथ' ही बातमी (लोकसत्ता- २१ मे) वाचली. भुजबळांनी एवढा कांगावा केला "जहा नहीं चैना वहा नही रहना" असे म्हटले, समाजाची ढाल बनवली, ती फक्त एका मंत्रीपदासाठी? ज्या फडणवीस यांनी भुजबळांना तुरुंगात टाकले, त्यांच्यावर एवढी बिकट परिस्थिती आली की त्यांनाच मंत्रिमंडळात घ्यावे लागले?

# भुजबळांवर केलेले आरोप खोटे होते?

अजित पवार आणि फडणवीस यांना ओबीसींनाच न्याय द्यायचा होता, तर एखाद्या तरुण ओबीसी आमदाराला मंत्रीपद का दिले नाही? सर्व ओबीसींचा ठेका भुजबळांनीच घेतला आहे का? आतापर्यंत जे आरोप भाजपने केले ते खोटे होते का?- बालाजी कापसे, मानवत (परभणी)



'भुजबळ यांना मंत्रीपदाची शपथ' ही बातमी (लोकसत्ता- २१ मे) वाचली. नियतीचा काव्यगत न्याय म्हणा किंवा राजकारणाची अपरिहार्यता म्हणा, मागील काही वर्षांत भारतीय जनता पक्षास, त्यांनी ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करून, जनतेची सहानुभूती मिळवून सत्ता प्राप्त केली, त्या साऱ्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याची वेळ आली. सत्ताप्राप्तीसाठी राबवलेल्या अजेंड्याचा तो एक भाग असावा. यात अडचण होते ती त्या पक्षाने समाजात, माध्यमांत आणि समाजमाध्यमांत जोपासलेल्या 'द्वेषभक्त' संप्रदायाची आणि किरीट सोमय्यादी नेत्यांची. त्यांनी भुजबळांच्या भ्रष्टाचाराबाबत वातावरणनिर्मिती केली, आता त्यांच्यावर भुजबळांच्या चातुर्यकथा पसरविण्याची जबाबदारी दिली गेल्यास नवल वाटू नये.छगन भुजबळ यांच्या महायुती सरकारमधील समावेशामुळे पुन्हा एकदा वादळ उठले आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तीला मंत्रिमंडळात स्थान कसे दिले जाते, असा प्रश्न विरोधकांकडून विचारला जात आहे. मात्र हे प्रश्न आजकाल फक्त औपचारिक ठरले आहेत, कारण अशा घटनांची सर्वांना सवयच झाली आहे. महायुती असो की महाविकास आघाडी किंवा तत्पूर्वीची कोणतीही सत्ता- सत्तेच्या समीकरणात ज्याचा राजकीय उपयोग असतो, त्या व्यक्तीचे गुन्हे, आरोप किंवा संदिग्ध भूतकाळ सहजपणे क्षम्य ठरवले जातात. त्या व्यक्तीला मानाचे पद देऊन सत्तेच्या पायऱ्या खुल्या केल्या जातात. या सगळ्यात राजकारण जिंकते आणि हरतो तो सामान्य मतदार. ज्याच्या मतावर सत्ता उभी असते त्याच्याकडे सत्तेवर आल्यावर लगोलग पाठ फिरवली जाते. राजकारणात आता मूल्य, नैतिकता, समाजहित यांना स्थान नाही, हीच सध्याच्या राजकारणाची शोकांतिका आहे.'वामन परतोनी गेला' हा अग्रलेख व जयंत नारळीकर यांच्याविषयीचे लेख (लोकसत्ता- २१ मे) वाचले. डॉ. नारळीकर कमालीचे वक्तशीर होते. १९८९ मध्ये मराठी विज्ञान परिषदेमार्फत गडहिंग्लज (कोल्हापूर) येथे आयोजित अखिल भारतीय विज्ञान संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पहिल्या दिवशी उद्घाटन समारंभात प्रथम स्वागत, प्रास्ताविक, सत्कार वगैरे नेहमीचे सोपस्कार पार पडल्यानंतर बहुधा १०-१५ मिनिटांचा अवकाश देण्यात आला होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महापुराचे पाणी मराठवाड्याकडे वळवणार!

## महापुराचा धोकाच राहणार नसल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जिल्हा परिषद, महापालिका, पंचायत समिती व नगरपंचायतीच्या निवडणुका होतील, यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी तयारीत राहावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सांगलीत झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात केले. तसेच महापुराचे पाणी मराठवाड्याकडे वळविण्याबाबतच्या कामाची निविदा प्रक्रिया येत्या १५ दिवसांत पूर्ण होणार असून, यानंतर सांगली, कोल्हापूरला महापुराचा धोकाच राहणार नसल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.**



मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपला यश मिळाले नाही, याची कारणे ज्ञात आहेत. मात्र, विधानसभा निवडणुकीत सांगली जिल्ह्याने पैकीच्या पैकी गुण मिळवले आहेत. आता सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. साधारण जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकीमध्ये सात दिवसांचे अंतर असते. यावेळी कार्यकर्त्यांनी विधानसभेप्रमाणेच यश संपादन केले पाहिजे. बहुतांशी स्थानिक स्वराज्य संस्था भाजपकडेच असाव्यात. दुसऱ्या पक्षाच्या ताब्यात या संस्था गेल्या तर गडबड होण्याची शक्यता निर्माण होते. आता सरकारही आपले आहे. विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही. महापुराचा धोका टाळण्यासाठी मी ७२ तासांचा मुख्यमंत्री झालो, त्यावेळी जागतिक बँकेशी करार केला असून, यानंतर उद्धव ठाकरे यांच्याकडे सूत्रे गेल्याने हा प्रकल्प रखडला होता. आता गेल्या दोन वर्षांत याला गती देण्यात आली असून, येत्या १५ दिवसांत महापुराचे पाणी मराठवाड्याकडे वळविण्याच्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईल. महापुरात सुमारे १५० टीएमसी पाणी समुद्रात जाते. या पाण्याने महाराष्ट्राचा निम्मा दुष्काळ हटवला जाऊ शकतो. हे पाणी उजनी, सोलापूर आणि मराठवाड्याकडे वळविले जाईल. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील तलाव, दुष्काळी भागातील तलाव पुराच्या पाण्याने भरून घेण्याचे प्रयोजन या प्रकल्पात करण्यात आले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूर व सांगलीला महापुराचा धोकाच उरणार नाही. सहा महिन्यांपूर्वी आपण मुख्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. यानंतर १०० दिवसांचा कार्यक्रम घेऊन राज्यातील १२ हजार कार्यालये स्वच्छ करण्याचे काम केले. यानंतर आता १५० दिवसांचा दुसरा कार्यक्रम हाती घेतला असून, यामध्ये ई – गव्हर्नसला प्राधान्य देण्यात आले आहे. यातून शासकीय दिरंगाई दूर करण्याचे प्रयत्न केले जातील. व्हॉट्सॲपवर अर्ज केल्यानंतर आवश्यक शासकीय शुल्कही याद्वारे भरता येईल आणि उत्तरही व्हाट्सॲपवर मिळेल. यासाठी शासनाने मेटाशी करार केला असल्याचे ते म्हणाले. यावेळी खा. धनंजय महाडिक, आ. सुधीर गाडगीळ, सुरेश खाडे, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर, पश्चिम महाराष्ट्र महामंत्री मकरंद देशपांडे, पृथ्वीराज देशमुख, ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, शहराचे जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग आदींसह पक्षाचे आजी, माजी पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपला यश मिळाले नाही, याची कारणे ज्ञात आहेत. मात्र, विधानसभा निवडणुकीत सांगली जिल्ह्याने पैकीच्या पैकी गुण मिळवले आहेत. आता सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. साधारण जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकीमध्ये सात दिवसांचे अंतर असते. यावेळी कार्यकर्त्यांनी विधानसभेप्रमाणेच यश संपादन केले पाहिजे.

### 150 टीएमसी पाणी समुद्रात जाते

बहुतांशी स्थानिक स्वराज्य संस्था भाजपकडेच असाव्यात. दुसऱ्या पक्षाच्या ताब्यात या संस्था गेल्या तर गडबड होण्याची शक्यता निर्माण होते. आता सरकारही आपले आहे. विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही.महापुराचा धोका टाळण्यासाठी मी ७२ तासांचा मुख्यमंत्री झालो, त्यावेळी जागतिक बँकेशी करार केला असून, यानंतर उद्धव ठाकरे यांच्याकडे सूत्रे गेल्याने हा प्रकल्प रखडला होता. आता गेल्या दोन वर्षांत याला गती देण्यात आली असून, येत्या १५ दिवसांत महापुराचे पाणी मराठवाड्याकडे वळविण्याच्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईल. महापुरात सुमारे १५० टीएमसी पाणी समुद्रात जाते. या पाण्याने महाराष्ट्राचा निम्मा दुष्काळ हटवला जाऊ शकतो.

# ठाकरे-पवार ब्रँड संपवण्याचा प्रयत्न!

## ब्रँड संपणार नाही मी हे लिहून द्यायला तयार : राज ठाकरे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्राचं राजकारण ठाकरे आणि पवार या दोन आडनावांभोवती गेल्या अनेक वर्षांपासून फिरतं आहे. ठाकरे असो किंवा पवार आजच्या घडीला या दोन्ही आडनावांकडे ब्रँड म्हणूनच पाहिलं जातं. याच बाबत प्रश्न विचारला असता राज ठाकरेंनी ठाकरे आणि पवार ब्रँड संपवण्याचा प्रयत्न होतो आहे हे सांगितलं त्याशिवाय एक बाब त्यांनी आत्मविश्वासाने नमूद केली.**



राज ठाकरे हे महाराष्ट्रातले असे नेते आहेत ज्यांचा करीश्मा सगळ्या राज्याने वेळोवेळी पाहिला आहे. सगळ्या प्रकारची टीका आपल्या खास शैलीतून परतवून लावण्याची त्यांची आक्रमक शैली महाराष्ट्राला माहीत आहे. काही दिवसांपूर्वीच राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना टाळी देण्याबाबत भाष्य केलं होतं.

दरम्यान अशाच एका मुलाखतीत राज ठाकरेंनी ठाकरे आणि पवार ब्रँड याबाबत विचारलेल्या प्रश्नावरही भाष्य केलं आहे.दिल्लीमध्ये जेव्हा-केव्हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला जातो. तेव्हा दोन आडनावं प्रकर्षाने येतात ठाकरे आणि पवार.. सध्याच्या परिस्थितीत या दोन्ही आडनावांचा जो ब्रँड आहे तो संपवण्याचा प्रयत्न चाललाय का? असा प्रश्न विचारला असता राज ठाकरेंनी उत्तर दिलं आहे. राज ठाकरे म्हणाले, “ठाकरे आणि पवार हे दोन ब्रँड संपवण्याचा प्रयत्न चालला आहे यात काही वादच नाही. पण तो ब्रँड संपणार नाही मी हे लिहून द्यायला तयार आहे. आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांचा महाराष्ट्रावर प्रभाव होता, त्यानंतर बाळासाहेब ठाकरेंचा प्रभाव होता. संगीत क्षेत्राचा विचार केला तर माझे वडील म्हणजेच श्रीकांत ठाकरेंचा प्रभाव दिसून आला. त्यानंतर माझा प्रभाव आहे, उद्धवचा आहे. व्यक्तिगत प्रभाव असतो पण आडनाव महत्त्वाचं असतंच. ती गोष्ट म्हणजेच आडनाव ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे.” असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. मुंबई तकसाठी साहिल जोशी आणि केदार शिंदे यांनी राज ठाकरेंची मुलाखत घेतली. या मुलाखतीत राज ठाकरेंनी हे विधान केलं आहे.

### राज ठाकरे नेमकं काय म्हणाले?

दिल्लीमध्ये जेव्हा-केव्हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला जातो. तेव्हा दोन आडनावं प्रकर्षाने येतात ठाकरे आणि पवार.. सध्याच्या परिस्थितीत या दोन्ही आडनावांचा जो ब्रँड आहे तो संपवण्याचा प्रयत्न चाललाय का? असा प्रश्न विचारला असता राज ठाकरेंनी उत्तर दिलं आहे. राज ठाकरे म्हणाले, “ठाकरे आणि पवार हे दोन ब्रँड संपवण्याचा प्रयत्न चालला आहे यात काही वादच नाही. पण तो ब्रँड संपणार नाही मी हे लिहून द्यायला तयार आहे. आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांचा महाराष्ट्रावर प्रभाव होता, त्यानंतर बाळासाहेब ठाकरेंचा प्रभाव होता. संगीत क्षेत्राचा विचार केला तर माझे वडील म्हणजेच श्रीकांत ठाकरेंचा प्रभाव दिसून आला. त्यानंतर माझा प्रभाव आहे, उद्धवचा आहे. व्यक्तिगत प्रभाव असतो पण आडनाव महत्त्वाचं असतंच. ती गोष्ट म्हणजेच आडनाव ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे.” असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# मोहम्मद युनूस राजीनामा देणार?

## लष्कराच्या इशाऱ्यानंतर बांगलादेशात हालचालींना वेग

| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**बांगलादेशात मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याचं कारण म्हणजे बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस हे राजीनामा देण्याच्या मनस्थितीत असल्याची माहिती समोर आली आहे. बांगलादेशात सध्या असणारी राजकीय परिस्थिती पाहता अशा वातावरणात येथील राजकीय पक्षांबरोबर काम करणं कठीण होत असल्याचं मत मोहम्मद युनूस यांनी बोलून दाखवलं असल्याची चर्चा आहे.**

त्यामुळे मोहम्मद युनूस हे राजीनामा देणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाल्या आहेत. यातच बांगलादेशच्या लष्कर प्रमुखांनी येत्या डिसेंबरपर्यंत निवडणुका घेण्याचं सांगितलं आहे. त्यामुळे बांगलादेशात पुन्हा एकदा राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाल्याची चर्चा सुरु झाली आहे. मात्र, या सर्व चर्चांवर आता मोहम्मद युनूस यांचे विशेष सहाय्यक फैज अहमद तय्यब यांनी प्रतिक्रिया देत युनूस हे आपल्या पदाचा राजीनामा देणार नसल्याचं स्पष्ट केलं. मात्र, पुढे बोलताना मोहम्मद युनूस यांना सत्तेचा लोभ नसल्याचंही त्यांनी म्हटलं. त्यामुळे पुन्हा वेगवेगळ्या चर्चांनी जोर धरला आहे.बांगलादेशचे लष्कर प्रमुख वकेर-उझ-जमान यांनी डिसेंबरपर्यंत निवडणुका घेण्यास सांगितल्याची माहिती समोर आली आहे. पण यावरून मुहम्मद युनूस यांच्या सहकाऱ्यांनी पुन्हा स्पष्ट केलं आहे की अंतरिम सरकारचं काम केवळ निवडणुका घेणं नाही तर त्यापलिकडे आहे. सुधारणा आणि न्याय ही प्राथमिकता असल्याचं सांगत युनूस यांच्या सहकाऱ्यांनी डिसेंबरच्या निवडणुकीच्या मागणीवर नकार दिला. तसेच जून २०२६ पर्यंत निवडणुका होतील असं सांगितलं.तसेच मोहम्मद युनूस राजीनामा देणार नाहीत, आणि एप्रिल किंवा मे २०२६ मध्ये निवडणुका होतील, असे संकेत फैज अहमद तैय्यब यांनी दिले आहेत. तसेच यावर सल्लागार सय्यदा रिझवाना हसन यांनी म्हटलं की, निवडणूक केवळ प्राधान्य नाही. आमच्यावर तीन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत. सुधारणा, न्याय आणि निवडणुका. आम्ही ही जबाबदारी केवळ निवडणुका घेण्यासाठी स्वीकारली नाही, असं म्हणत लष्कर प्रमुखांच्या इशाऱ्याला विरोध केला. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. दरम्यान, मोहम्मद युनूस सरकारचे विशेष सल्लागार फैज अहमद तैय्यब यांनी म्हटलं की, मोहम्मद युनूस हे राजीनामा देणार नाहीत. तसेच त्यांच्या मतांनुसार निवडणुकीची अचूक तारीख जाहीर करणं हे केवळ मोहम्मद युनूस यांच्या अधिकारक्षेत्रात येतं. इतर कोणीही त्या अधिकाराचं उल्लंघन करू शकत नाही. जेव्हा त्यांना अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करण्यात आली तेव्हा त्यांनी विमानतळावर म्हटलं होतं की तुम्हाला माझं ऐकावं लागेल", असं फैज अहमद तैय्यब यांनी म्हटलं आहे.दरम्यान, बांगलादेशात निवडणुका घेणं आता एक वादाचा मुद्दा बनला असल्याची परिस्थिती निर्माण झाल्याचं दिसून येत आहे. लष्करप्रमुख जनरल वकेर-उझ-जमान यांनी २१ मे रोजी युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारने डिसेंबरपर्यंत निवडणुका घ्याव्यात, असं म्हटलं आहे. तसेच दुसरीकडे १० मे रोजी अवामी लीगवर बंदी घालण्यात आल्यानंतर संपूर्ण देशात उपस्थिती असलेला एकमेव मोठा पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने निवडणुकीसाठी रोड मॅप तयार करण्याचं आवाहन केलं होतं. मात्र, मुहम्मद युनूस यांनी यापूर्वीही सांगितलं होतं की पुढील वर्षी जूनपर्यंत निवडणुका होणार नाहीत.यातच बांगलादेशच्या लष्कर प्रमुखांनी येत्या डिसेंबरपर्यंत निवडणुका घेण्याचं सांगितलं आहे. त्यामुळे बांगलादेशात पुन्हा एकदा राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाल्याची चर्चा सुरु झाली आहे. मात्र, या सर्व चर्चांवर आता मोहम्मद युनूस यांचे विशेष सहायक फैज अहमद तय्यब यांनी प्रतिक्रिया देत युनूस हे आपल्या पदाचा राजीनामा देणार नसल्याचं स्पष्ट केलं.



### युनूस राजीनामा देणार नाहीत

मात्र, पुढे बोलताना मोहम्मद युनूस यांना सत्तेचा लोभ नसल्याचंही त्यांनी म्हटलं. त्यामुळे पुन्हा वेगवेगळ्या चर्चांनी जोर धरला आहे. बांगलादेशचे लष्कर प्रमुख वकेर-उझ-जमान यांनी डिसेंबरपर्यंत निवडणुका घेण्यास सांगितल्याची माहिती समोर आली आहे. पण यावरून मुहम्मद युनूस यांच्या सहकाऱ्यांनी पुन्हा स्पष्ट केलं आहे की अंतरिम सरकारचं काम केवळ निवडणुका घेणं नाही तर त्यापलिकडे आहे. सुधारणा आणि न्याय ही प्राथमिकता असल्याचं सांगत युनूस यांच्या सहकाऱ्यांनी डिसेंबरच्या निवडणुकीच्या मागणीवर नकार दिला. तसेच जून २०२६ पर्यंत निवडणुका होतील असं सांगितलं. तसेच मोहम्मद युनूस राजीनामा देणार नाहीत.

# हार्वर्ड विद्यापीठाचा ट्रम्प प्रशासनाला दणका!

## विदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेश बंदीच्या निर्णयाविरोधात दाखल केला खटला

| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्यांच्या निर्णयांमध्ये नवीन टॅरिफ धोरण (आयात शुल्क) आणि अमेरिकेतील कर्मचारी कपात, बेकायदेशीर स्थलांतरितांचा मुद्दा यासह आता आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास हार्वर्ड विद्यापीठावर बंदी करण्यात आल्याच्या निर्णयाचा समावेश आहे. अनेक देशांना बसला आहे.त्यानंतर आता हार्वर्डमध्ये शिक्षण घेणाऱ्या भारतासह विदेशातील विद्यार्थ्यांना देखील ट्रम्प यांच्या निर्णयांचा फटका बसला आहे.**



या निर्णयांची संपूर्ण जगात चर्चा सुरु असतानाच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. हार्वर्ड विद्यापीठाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना थेट आव्हान दिलं आहे. हार्वर्ड विद्यापीठ प्रशासनाने ट्रम्प प्रशासनाच्या विरोधात खटला दाखल केला असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने गुरुवारी राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंता आणि कॅम्पसमधील कथित गैरवर्तनाचे कारण देत हार्वर्ड विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी असलेले प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. एवढंच नाही तर हार्वर्ड विद्यापीठात शिकणाऱ्या विदेशी विद्यार्थ्यांसाठी ६ अटींच्या पूर्ततेसाठी ७२ तासांची मुदत देण्यात आलेली आहे. तसेच जर या अटींची पूर्तता केली नाही तर अनेक विद्यार्थ्यांना अमेरिका देखील सोडावी लागू शकते. दरम्यान, आता डोनाल्ड ट्रम्प यांनी हार्वर्ड विद्यापीठाच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात हार्वर्ड विद्यापीठाने शुक्रवारी ट्रम्प प्रशासनाविरुद्ध खटला दाखल करत हा चुकीचा निर्णय असल्याचं म्हटलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने घेतलेल्या निर्णयानंतर अवघ्या काही तासांतच हार्वर्ड विद्यापीठाने थेट न्यायालयात धाव घेत ट्रम्प प्रशासनाचा निर्णय बेकायदेशीर असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाला धक्का बसला आहे.

### बेकायदेशीर कृतीचा निषेध

ट्रम्प यांच्या या निर्णयाला अमेरिकन संविधान आणि इतर कायद्यांचं उल्लंघन असल्याचं विद्यापीठाने म्हटलं आहे. या संदर्भात हार्वर्ड विद्यापीठाने बोस्टन फेडरल कोर्टात तक्रार दाखल केली असल्याची माहिती समोर आली आहे. हार्वर्ड विद्यापीठाने दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं आहे की, विदेशी विद्यार्थ्यांची प्रवेश बंदी केल्याने विद्यापीठावर आणि ७००० हून अधिक व्हिसा धारकांवर गंभीर परिणाम होतील. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने हार्वर्डच्या विद्यार्थ्यांचा एक चतुर्थांश भाग संपवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे.हार्वर्डने ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाचा निषेध केला असून निर्णयाला बेकायदेशीर म्हटलं आहे. आम्ही या बेकायदेशीर कृतीचा निषेध करतो.

# समांथा रुथ प्रभूला दाक्षिणात्य इंडस्ट्रीत 15 वर्षे पूर्ण

अभिनेत्री समांथा रुथ प्रभू ही दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. आजवर तिनं अनेक चित्रपटांतून विविध भूमिका साकारत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. अशातच नुकतीच समांथाला इंडस्ट्रीत १५ वर्षे पूर्ण झाली आहेत. एका अवॉर्ड सोहळ्यादरम्यान समांथाला इंडस्ट्रीत १५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त केक कापण्यात आला होता. त्यावेळी समांथानं भावूक होत तिच्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमादरम्यान संवाद साधताना समांथा म्हणाली, "तेलुगू चित्रपटसृष्टीनं मला खूप काही दिलं आहे. ही माझी कर्मभूमी आहे. त्यामुळे मी कायम तेलुगू प्रेक्षकांना प्राधान्य देऊन त्यांचं मनोरंजन करण्याचा प्रयत्न करेन." त्यावेळी तिथे उपस्थित अनेकांनी टाळ्या वाजवत तिचं कौतुक केलं. त्यादरम्यानच सुरू असलेल्या अवॉर्ड सोहळ्यात समांथाचा पूर्वपती नागा चैतन्यची सावत्र आई उपस्थित होती. समांथाला इंडस्ट्रीत १५ वर्ष पूर्ण झाल्यानं त्यांनीदेखील टाळ्या वाजवून तिचं कौतुक केल्याचं 'झी तेलुगू'ने शेअर केलेल्या व्हिडीओमधून पाहायला मिळतं.समांथानं २०१० साली 'ये माया चेसावे' या चित्रपटातून इंडस्ट्रीत पदार्पण केलं होतं. सध्या समांथा दाक्षिणात्य इंडस्ट्रीतली लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. या १५ वर्षांच्या कारकिर्दीत समांथाच्या खासगी जीवनातही महत्त्वाच्या घटना घडल्याचं पाहायला मिळालं. या सर्वांमधून बाहेर येत ती पुन्हा उभी राहिली आणि आता केवळ अभिनयापुरतंच मर्यादित न राहता, तिनं निर्मिती क्षेत्रातही पदार्पण केलं आहे. समांथा गेल्या काही काळात 'खुशी', 'शकुंतलम', 'पुष्पा' यांसारख्या चित्रपटांमध्ये काम करताना दिसली आणि लवकरच ती 'रक्त ब्रह्मांड : द ब्लडी किंग्डम' यांसारख्या हिंदी चित्रपटांतून बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्यांसह महत्त्वाच्या भूमिकांत झळकणार आहे.समांथा सध्या 'सिटाडेल : हनी बनी'चे दिग्दर्शक राज निदिमोरूसह रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा सुरू आहेत. पण, या दोघांनीही अद्याप याबाबत कुठलाही खुलासा केलेला नाही. समांथा राज निदिमोरूबरोबरचे अनेक फोटो सोशल मीडियावर शेअर करीत असते.

## 'धुरंधर' चित्रपटातील नवा लूक!

रणवीर सिंह सध्या आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. हा चित्रपट जाहीर झाल्यापासूनच चर्चेत आहे. आता सोशल मीडियावर या अभिनेत्याचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये त्याचे जबरदस्त ट्रान्सफॉर्मेशन पाहून सर्वांनाच धक्का बसला आहे. रणवीर एका रफ अँड टफ लूकमध्ये दिसत आहे. त्यामध्ये रणवीर पूर्णपणे नवीन अवतारात दिसत आहे, ज्यामुळे चाहत्यांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे. हा व्हिडीओ फिल्मफेअरने त्यांच्या इन्स्टा पेजवर शेअर केला आहे. रणबीर वाढलेल्या दाढी आणि लांब केसांसह रस्त्यावर मोकळेपणाने फिरत आहे.व्हिडीओ व्हायरल होताच चाहत्यांनी त्यावर मजेदार कमेंट्स करायला सुरुवात केली. एका वापरकर्त्याने लिहिले- ब्लॉकबस्टर लोडिंग. दुसऱ्याने लिहिले- लवकरच एक ब्लॉकबस्टर चित्रपट येत आहे. संजय दत्त, यामी गौतम, अक्षय खन्ना, आर. माधवन व अर्जुन रामपाल यांसारखे कलाकार 'धुरंधर'मध्ये रणवीरबरोबर दिसतील.

## आलिया निघाली 'कान्स'ला



बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट्ट २०२५ च्या कान्स फिल्म फेस्टिवलमधील पदार्पणासाठी सज्ज झाली आहे. शुक्रवारी २३ मे रोजी सकाळी आलिया 'कान्स'ला जाण्यासाठी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचली. तिथे उपस्थित असलेल्या पापाराझींनी अभिनेत्रीला बॉसी लूकमध्ये पाहिले.काही दिवसांपूर्वी भारत-पाकिस्तान तणावामुळे आलिया भट्ट तिचा डेब्यू अपिअरन्स रद्द करू शकते, अशा अफवा पसरल्या होत्या. बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट्ट शुक्रवारी सकाळी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दिसली. ती सध्या सुरू असलेल्या कान्स फिल्म फेस्टिवल २०२५ मध्ये पदार्पण करण्यासाठी रवाना झाली आहे.आलिया भट्टने स्कूप्ड नेकलाइन आणि सिग्नेचर हिरव्या व लाल रंगाच्या पट्ट्यांसह गुची टँक टॉप निवडला, ज्याची किंमत ५९,४५२ रुपये आहे. आलिया भट्टने तिचा लूक ऑलिव्ह रंगाच्या गुची मॅक्सी शोल्डर बॅगने पूर्ण केला, ज्यामुळे तिच्या आउटफिटमध्ये एक बोल्ड कॉन्ट्रास्ट जोडला गेला होता. या लक्झरी आर्म कँडीची किंमत सुमारे ३,००,००० रुपये आहे. आलिया भट्ट बॉसी लूकमध्ये स्मार्ट दिसत होती. काळ्या सनग्लासेसने तिच्या लूकमध्ये भर घातली. उघड्या केसांनी आणि कमीत कमी मेकअपने ती खूप सुंदर दिसत होती.आलियाचे 'कान्स'ला जाणे तिच्या चाहत्यांसाठी आश्चर्याचा धक्का होता. कारण- काही दिवसांपूर्वी अशी अटकळ होती की, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये सुरू असलेल्या तणावानंतर ती भारताबरोबर एकता दर्शविण्यासाठी फिल्म फेस्टिवलमध्ये सहभागी होणार नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, आलिया लॉरियलची ॲम्बेसेडर म्हणून 'कान्स'मध्ये पदार्पण करणार होती आणि ती भव्य उद्घाटनालाही उपस्थित राहणार होती; परंतु भारत आणि पाकिस्तानमधील सध्याच्या तणावामुळे तिला देशाबरोबर एकता दर्शवायची होती. म्हणून तिने न जाण्याचा निर्णय घेतला होता.आलियाने इन्स्टाग्राम स्टोरीजवर तिच्या कान्स पदार्पणाबद्दल आनंद व्यक्त केला. तिने तिच्या गुची बॅगचा फोटो पोस्ट केला, ज्यामध्ये पुस्तके आणि ब्यूटी प्रॉडक्ट्सने भरलेली बॅग होती, ज्यावर लिहिले होते, 'आय एम वर्थ इट'. फोटो शेअर करताना तिने लिहिले, 'आम्ही जातो... ' त्याशिवाय,आलियाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर कॉफीचा फोटोदेखील शेअर केला आहे.

## सलमानच्या गॅलेक्सी बाहेरील सुरक्षा वाढवली

बॉलीवूड अभिनेता सलमान खान सध्या चर्चेत आला आहे. सलमानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. काल (२२ मे) एका महिलेने सलमान खानच्या घरात घुसण्याचा प्रयत्न केल्याचं वृत्त समोर आलं होतं. त्यानंतर त्या महिलेला अटक झाल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली होती. अशातच आता मुंबई पोलिस सलमानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटची सुरक्षा वाढविण्याच्या विचारात आहेत. पी.टीआयच्या माहितीनुसार त्याच्या घरामध्ये येणाऱ्या-जाणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. घरातील सदस्यांच्या ओळखीशिवाय बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीला 'गॅलेक्सी'मध्ये प्रवेश मिळणार नाही. सलमान खानच्या सुरक्षेकरिता हे सर्व करण्यात येत आहे.या आठवड्यात २२ मे रोजी एक महिला व पुरुष अशा दोघांना सलमानच्या घरातून अटक करण्यात आली. महिलेचं नाव ईशा छाब्रिया, तर पुरुषाचं नाव जितेंद्र सिंग असे होते. यादरम्यान, तेथील काही अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार सलमानला धमकी देण्यात आल्याचंही म्हटलं जात आहे. त्यामुळे पोलिसांनी त्याच्या घराची सुरक्षा वाढवण्याचं नियोजन केलं आहे. घरातील इतर सदस्यांच्या आयुष्यात व्यत्यय न आणता, गोपनीयता व सुरक्षितता यांच्यात संतुलन राखण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे.बॉलीवूड अभिनेता सलमान खान सध्या चर्चेत आला आहे. सलमानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. काल (२२ मे) एका महिलेने सलमान खानच्या घरात घुसण्याचा प्रयत्न केल्याचं वृत्त समोर आलं होतं.

## नम्रता संभेरावची खास मैत्रीण आहे तेजस्विनी पंडित



अभिनेत्री तेजस्विनी पंडित मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. आजवर तिने अनेक चित्रपटांमधून काम करीत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. तर आता तिने अभिनयासह निर्मिती क्षेत्रातह पाऊल ठेवलं आहे. तेजस्विनी पंडितचा आज वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त अनेकांनी सोशल मीडियामार्फत तिला शुभेच्छा देत तिचे काही फोटोज व व्हिडीओ शेअर केले आहेत. अशातच अभिनेत्री नम्रता संभेरावनेही तेजस्विनीसाठी सोशल मीडियावर खास पोस्ट केली आहे. नम्रताने तेजस्विनीच्या वाढदिवसानिमित्त इन्स्टाग्रामवर पोस्ट केली असून, त्यामध्ये तिने तेजस्विनीबरोबरचे काही खास फोटो शेअर केले आहेत. यावेळी नम्रताने या फोटोंना खास कॅप्शनही दिले आहे. तिने लिहिले आहे, "तुला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! माझी लाडकी जवळची मैत्रीण. जगातली सगळी सुखं तुझ्या पदरात पडो हीच प्रार्थना! माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे."तेजस्विनीचा खास मित्र सिद्धार्थ जाधवनेही तिच्या वाढदिवसानिमित्त इन्स्टाग्रामवर पोस्ट केली आहे. सिद्धार्थने तेजस्विनीबरोबरचे खास फोटो शेअर केले आहेत. त्याने या फोटोंना 'वाढदिवसाच्या शुभेच्छा बंड्या, आयुष्यात अशीच मॅड राहा, खूप प्रेम' अशी कॅप्शनही दिली आहे. नम्रता, सिद्धार्थसह इंडस्ट्रीतील अनेक कलाकारांनी तेजस्विनीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# नंबर 1 बनण्याची संधी गमावली!

## हैदराबादचा विजय अन् पंजाब–मुंबईचा मार्ग मोकळा

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला हा सामना जिंकण्यासाठी आतपर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडून काढायचे होते. सनरायझर्स हैदराबादने पहिल्या डावात २३१ धावांचा डोंगर उभारला होता. आतापर्यंत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने केवळ २ वेळेस २०० पेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग केला होता. २३२ धावांचा पाठलाग करणं म्हणजे डोंगर सर करण्यासारखंच होतं. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला हवी तशी सुरूवात मिळाली, पण शेवट हवा तास करता आला नाही. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला हा सामना ४२ धावांनी गमवावा लागला आहे.**




हैदराबादला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. हे आमंत्रण स्वीकारून हैदराबादने २० षटकांअखेर २३१ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून विराट कोहली आणि फिल सॉल्ट ही सलामी जोडी मैदानात आली. दोघांनी मिळून पावरप्लेमध्ये हैदराबादच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ८० धावा जोडल्या. त्यानंतर विराट कोहली ४३ धावा करत माघारी परतला.विराट बाद होऊन माघारी परतल्यानंतर फिल सॉल्टने दुसऱ्या हैदराबादच्या गोलंदाजांची धुलाई सुरू ठेवली. त्याने ६२ धावा चोपल्या. बंगळुरूच्या फलंदाजांनी जशी सुरूवात केली तसा शेवट करता आला नाही. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संपूर्ण डाव १८९ धावांवर आटोपला आहे. यासह हा सामना सनरायझर्स हैदराबादने ४२ धावांनी आपल्या नावावर केला. या पराभवामुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा गुणतालिकेत टॉप २ मध्ये जाण्याचा मार्ग आणखी कठीण झाला आहे.या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी मैदानात आला. हैदराबादकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना ईशान किशनने सर्वाधिक ९४ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ७ चौकार आणि ५ षटकार खेचले. तर सलामीला आलेल्या अभिषेक शर्मांने ३४ धावांची खेळी केली. ट्रॅव्हीस हेडला या डावात १७ धावा करता आल्या. शेवटी अनिकेच वर्माने २६, हेनरिक क्सासेनने २४ धावांची खेळी करत संघाची धावसंख्या २३१ धावांपर्यंत पोहोचवली.लखनऊच्या एकाना स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना सुरू आहे. या सामन्यात पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या सनरायझर्स हैदराबादने २० षटकांअखेर २३१ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या विराट कोहली आणि फिल सॉल्टने दमदार सुरूवात करून दिली. यादरम्यान विराट कोहलीने आयपीएल स्पर्धेत एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघातील सर्वात विश्वासू फलंदाज विराट कोहलीने आयपीएल स्पर्धेतील मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. विराट कोहली एकाच संघाकडून ८०० चौकार मारणारा पहिलाच फलंदाज ठरला आहे.

### कोहलीचा 'विराट' रेकॉर्ड!

विराट कोहलीने या डावात २५ चेंडूंचा सामना करत ४३ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ७ चौकार आणि १ षटकार मारला.विराट कोहली आयपीएलच्या पहिल्या हंगामापासून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघासाठी खेळत आहे. यादरम्यान त्याने धावांचा पाऊस पाडला आहे. आता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघासाठी सर्वाधिक चौकार मारण्याचा रेकॉर्ड हा विराट कोहलीच्या नावावर झाला आहे. विराट कोहलीने या संघासाठी आतापर्यंत २६४ सामने खेळले आहेत. यादरम्यान विराट कोहलीने ८०० चौकार खेचले आहेत. या यादीत जेम्स विंस दुसऱ्या स्थानी आहे. त्याने हॅम्पशायर संघासाठी खेळताना ६९४ चौकार खेचले आहेत. तर ॲलेक्स हेल्सने नॉटिंगहॅमशायर संघासाठी खेळताना ५६३ चौकार मारले आहेत. मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माने मुंबई इंडियन्ससाठी ५५० चौकार मारले आहेत. तर ल्यूक राईटने ससेक्स संघासाठी ५२९ चौकार मारले आहेत.

# चेतेश्वर पुजारा इंग्लंड दौऱ्यावर जाणार!

## चेतेश्वर पुजाराचा समालोचक म्हणून समावेश करण्यात आला

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**आयपीएल २०२५ स्पर्धा शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. ही स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ कसोटी मालिका खेळण्यासाठी इंग्लंड दौऱ्यासाठी जाणार आहे. दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. ही मालिका दोन्ही संघांसाठी अतिशय महत्वाची असणार आहे. कारण ही मालिका आगामी विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील पहिलीच मालिका असणार आहे. या मालिकेसाठी शनिवारी भारतीय संघाची घोषणा केली जाणार आहे.**



भारतीय संघाचे माजी क्रिकेटपटू राहुल द्रविड यांनी कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघासाठी 'द वॉल'ची भूमिका पार पाडली. राहुल द्रविडला बाद करण्यासाठी गोलंदाजांना घाम फुटायचा. राहुल द्रविडने कसोटी क्रिकेटला रामराम केल्यानंतर ही भूमिका चेतेश्वर पुजाराने पार पाडली. भारतात खेळताना तो चमकला, यासह इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकांसारख्या देशांमध्येही खंबीरपणे उभा राहिला. मात्र त्याला फलंदाजीत सातत्य टिकवून ठेवता आलं नाही. त्यामुळे त्याला संघातील स्थान गमवावं लागलं आहे. ७ जून २०२३ मध्ये तो आपला शेवटचा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. त्यानंतर त्याला भारतीय संघात कमबॅक करता आलेलं नाही. आता तो समालोचकाच्या भूमिकेत दिसणार आहे.भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना चेतेश्वर पुजारा समालोचन करताना दिसून आला होता. आता सोनी स्पोर्ट्सकडून भारत – इंग्लंड कसोटी मालिकेसाठी इंग्रजी समालोचनासाठी समालोचकांची यादी जाहीर केली आहे. ज्यात चेतेश्वर पुजाराचा देखील समावेश करण्यात आला आहे. या यादीत पुजारासह, संजना गणेशन, हर्षा भोगले, सुनील गावस्कर, मायकल वॉ, मायकेल अथर्टन आणि नासीर हुसैन यांचा समावेश करण्यात आला आहे. चेतेश्वर पुजारा हा भारतीय कसोटी संघातील विश्वासू फलंदाजांपैकी एक आहे. मात्र, आऊट ऑफ फॉर्म असल्यामुळे त्याला संघात स्थान मिळवता आलेलं नाही. २०२३ मध्ये तो ऑस्ट्रेलियाविरूद्ध शेवटचा कसोटी सामना खेळताना दिसून आला होता. त्यानंतर त्याला संघातील स्थान गमवावं लागलं. त्याच्या कसोटी कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं.

### चेतेश्वर पुजाराचा रेकॉर्ड

यादरम्यान त्याने ४३.६ च्या सरासरीने ७१९५ धावा केल्या आहेत. ज्यात १९ शतकं आणइ ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. यादरम्यान नाबाद २०६ धावा ही त्याची सर्वोत्तम खेळी आहे.आयपीएल २०२५ स्पर्धा शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. ही स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ कसोटी मालिका खेळण्यासाठी इंग्लंड दौऱ्यासाठी जाणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।

। दि. 24 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांची माहिती

# सोसायटीधारकांना समस्या मांडण्यासाठी आता हक्काचे कार्यालय!

## चिखली- मोशी- पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या नूतन कार्यालयाचे 25 मे रोजी लोकार्पण

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी फेडरेशन बद्दल माहिती दिली. चिखली-मोशी- पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ ( सोसायटी फेडरेशन) या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी काम करणाऱ्या सहकारी संस्थेची स्थापना एक ऑक्टोबर 2016 रोजी पिंपरी चिंचवड शहरातील सोसायटी धारकांनी सर्वांनी एकत्र मिळून केली आहे .सोसायटी फेडरेशनची स्थापना झाल्यापासून या फेडरेशनच्या माध्यमातून सोसायटीधारकांच्या अनेक समस्या सोडवलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित असणाऱ्या पाणी, वीज, कचरा, रोड याबाबत असणाऱ्या समस्या त्याचप्रमाणे. पिंपरी चिंचवड शहरातील बांधकाम व्यवसायिकांनी अनेक गृहप्रकल्पातील नागरिकांना दिलेली आश्वासन पूर्ण न करता प्रकल्प उभारले गेले होते. यावर देखील अनेक गृहप्रकल्पातील नागरिकांना फेडरेशन मार्फत महानगरपालिकेमध्ये त्याचप्रमाणे बिल्डर बरोबर समन्वय साधून काम करून दिलेली आहेत.**



या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या महासंघामध्ये ( सोसायटी फेडरेशन )मध्ये 1668 सहकारी गृह रचना संस्था (सोसायट्या ) सभासद आहेत. तसेच या संस्थेमध्ये पस्तीस हजार सदनिका ( फ्लॅट )सभासद आहेत.फेडरेशनच्या माध्यमातून 566 सहकारी गृह रचना संस्थांच्या कन्व्हेन्स डीड करून देऊन सातबारा उताऱ्यावर नाव लावून दिलेली आहेत.अनेक सोसायट्याचे बिल्डरच्या बाबतीत असणारे अनेक प्रश्न, समस्या सोडवलेल्या आहेत.

### समस्या सोडवण्याचे हक्काचे कार्यालय....

सहकारी गृहनिर्माण संस्था अधिनियम 1960 , 1961 नुसार सहकारी गृह रचना संस्था कशा चालवाव्यात याबद्दल फेडरेशन मार्फत मार्गदर्शन केले जाते, सोसायटी मेंटेनन्स, सोसायटी निवडणूक, ऑडिट, देखभाल खर्च वसुली, अशी अनेक कामे फेडरेशनच्या माध्यमातून करून दिली जातात. त्याचप्रमाणे बिल्डर कडून अपूर्ण राहिलेली सर्व काम फेडरेशन कडून करून दिली जातात. महानगरपालिकेकडून कर आकारणी तसेच कचरा,पाणी , वीज याबाबतीतच्या असणाऱ्या सर्व समस्या फेडरेशन मार्फत सोडवल्या गेलेल्या आहेत.

### लोकप्रतिनिधींचा सहभाग महत्त्वाचा....

नागरी भागातील प्रश्न किंवा समस्या सोडवताना तेथील लोकप्रतिनिधींचे सहभाग महत्वाचा असतो हा सहभाग भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून मिळाला. त्यांच्या पुढाकारातून अनेक समस्या मार्गी लागल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहरात सोसायटी धारकांच्या नागरीवस्ती शेजारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून उभारण्यात येणारी कचरा संकलन व वितरण केंद्र फेडरेशन मार्फत आमदार लांडगे यांच्या पाठपुराव्याने बंद करण्यात आलेली आहेत. सोसायटी धारकांवर लादलेला 168 कोटी रुपयांचा उपयोगकर्ता शुल्क फेडरेशनच्या माध्यमातून रद्द करून घेण्यात आलेले आहे. सारथी ॲप मध्ये सोसायटी धारकांना समस्या मांडण्यासाठी वेगळी व्यवस्था फेडरेशनच्या पाठपुराव्याने महानगरपालिकेने केलेली आहे.

> “ महाराष्ट्रातील सर्वात मोठी अग्रगण्य अशी सहकारी चळवळ म्हणून चिखली- मोशी- पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन नावारूपाला आलेले आहे. याच संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय, जाधववाडी सीएनजी पंपाच्या समोर, राजगड रो हाऊस नंबर तीन, सेक्टर 13 चिखली प्राधिकरण या ठिकाणी चालू केले जात आहे. फेडरेशनच्या कार्यालयाचे उद्घाटन भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते 25 मे रोजी सकाळी 11 वाजता करण्यात येणार आहे. हे कार्यालय चालू झाल्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील सोसायटीधारकांसाठी त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.
>
> **- संजीवन सांगळे , अध्यक्ष, चिखली-मोशी- पिंपरी- चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**




ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
26th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org